दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०२ जुलै २०२५




# छत्रपती संभाजीनगरकरांसाठी आनंदाची वार्ता !

## आषाढीनिमित्त धावणार १३५ एसटी बसेस, असे आहे नियोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, छत्रपती संभाजीनगर :** यंदा आषाढी एकादशीनिमित्त छत्रपती संभाजीनगर विभागातून १३५ एसटी गाड्यांचे प्रवासी वाहतूकीसाठी नियोजन करण्यात आले आहे. आगामी दोन जुलैपासून ही सुविधा सुरू होणार आहे. या यात्रेच्या नियोजनासाठी यात्रा स्पेशल दर घोषित करण्यात आले आहे. यंदाही नवीन गाड्या नसल्याने जुन्या गाड्यातून पंढरपूरला जाणाऱ्या यात्रेकरूंना प्रवास करावा लागणार आहे.



आषाढी एकादशीसाठी अनेक जण वाऱ्यामधुन पंढरपुराच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी निघाले आहेत. आषाढी एकादशीसाठी अनेक जण छत्रपती संभाजीनगर विभागातून बसचे नियोजन करण्यात आले आहे. पंढरपूर यात्रेसाठी विशेष बस सोडण्यात आले आहे. पंढरपूर यात्रेला जाणाऱ्या प्रवाशांसाठी विशेष मंडप टाकून, त्यांच्यासाठी विशेष सोय करण्यात येत असते. यंदाही प्रवाशांसाठी विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. आषाढी एकादशीसाठी दोन जुलैपासून ते १३ जुलै या दरम्यान चालविण्यात येणार आहे. आषाढी एकादशीनिमित्त चिकलठाणा, पुणे किंवा नागपूर येथे तयार होणाऱ्या नवीन गाड्या यात्रेसाठी दिल्या जात होत्या. या परंपरेत खंड पडला आहे. यंदाच्या वर्षीही नवीन गाड्या आषाढी एकादशीसाठी सोडण्यात येणार नाही. यंदाच्या वर्षी जुन्या गाड्यांमधुन पंढरपुराच्या भक्तांना प्रवास करावा लागणार आहे.

**असे राहणार यात्रा स्पेशल दर**

छत्रपती संभाजीनगर-पंढरपूरमार्गे अहिल्यानगर - ५३४ रुपये
छत्रपती संभाजीनगर-पंढरपूरमार्गे बार्शी - ५९४ रु
पैठण-पंढरपूरमार्गे अहिल्यानगर - ५०४ रु
पैठण-पंढरपूर पाथर्डी, कडा, मिरगाव, करमाळा - ४६३ रु
गंगापूर-पंढरपूरमार्गे अहिल्यानगर, करमाळा - ४७३ रु.
वैजापूर-पंढरपूरमार्गे गंगापूर, अहिल्यानगर - ५४४ रु.
कन्नड-पंढरपूरमार्गे गंगापूर, अहिल्यानगर करमाळा - ५९४ रु.
सिल्लोड-पंढरपूरमार्गे जालना, बीड, बार्शी - ६६४ रु.
सोयगाव-पंढरपूरमार्गे सिल्लोड, जालना, बीड, बार्शी - ७६५ रु.

**असे आहे नियोजन...**

छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती बस स्थानक आगार २ - २५ बस
छत्रपती संभाजीनगर सिडको आगार क्रमांक १ - ३० बस
पैठण - २० बस
सिल्लोड - २० बस
वैजापुर - १० बस
कन्नड - १० बस
गंगापूर - १० बस
सोयगाव - १० बस

# १०८ रुग्णवाहिका चालक आक्रमक !

## अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काम बंद आंदोलन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** राज्यातील १०८ ॲम्बुलन्स वाहन चालक गेल्या अनेक वर्षापासून अत्यंत महत्त्वपूर्ण सेवा देत आहे. त्यांच्या समस्यांबाबत १३ मे २०२५ रोजी आझाद मैदान मध्ये आंदोलन करून निवेदन दिले होते त्यावेळी १०८ वाहन चालकांच्या मागण्यांबाबत शासनाने व बीव्हीजी कंपनीने सकारात्मक भूमिका घेऊन न्याय देण्याचे आश्वासन दिले गेले. मात्र कोणतीही कारवाई झाली नसून राज्यातील १०८ ॲम्बुलन्स चालकांचा काम बंद आंदोलन सुरू करून अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करताना १०८ रुग्णवाहिका चालक युनियन संघटनेचे अध्यक्ष अशोक कराळे, उपाध्यक्ष अतुल शिंदे, सोमनाथ बांडे, संजय दरवडे, सतीश शिरसाठ, नितीन चेमटे, शरद अस्वर, संजय ओहोळकर, राहुल वाकचौरे, वाल्मीक शितोळे, संतोष चौधरी, भीमराज मकाटे, जगन्नाथ खेमनार, आप्पासाहेब झुंबड, किशोर घनवट, सुनील देशमुख, आदीसह चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सेवा पुरवठा बीव्हीजी कंपनी कडून कुठलाही प्रतिसाद मिळत नाही. चालक संघटनेने ही सेवा बीव्हीजी कंपनी यांना निवेदन देऊन चर्चा करण्याची विनंती केली होती. १५ जून पर्यंत चर्चा करून मागण्याचे पूर्तता न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा ही देण्यात आला होता. परंतु




१०८ वाहनचालकांच्या मागण्यांबाबत कुठलीही हालचाल करण्यात आली नाही. त्यामुळे रुग्णवाहिका चालकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होऊन त्यांच्या अल्प वेतनावर त्यांना काम करावे लागते. समान काम समान वेतन दिले पाहिजे व पीएफ २०१४ ते २०१७ पर्यंत कापलेला नसून तो मिळावा. कोविड काळामध्ये रुग्णवाहिका चालकांनी जीवावर उदार होऊन काम केले आहे.

त्यामुळे आता बीव्हीजी कंपनी ही या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय रुग्णवाहिका चालक युनियनने घेतला असून लवकरात लवकर मागण्या मान्य करण्यात याव्यात अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# मुंबईकरांचा दुपारच्या जेवणाचा डबा महागला

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०१, मुंबई :** दिवसांगणित वाढणारी महागाई, इंधन आणि इतर वस्तूंची झालेली दरवाढ यामुळे मुबंईत नुकतीच रिक्षा आणि बसच्या दरात वाढ करण्यात आली.याच परश्वभूमीवर आपल्या वक्तशीरपणाबाबत जगभरात ख्याती असलेल्या आणि मुंबईकर नोकरदार वर्गाला अगदी वेळेवर घरचे जेवण पोहचवीणाऱ्या दाबेवाल्यांनी देखील जुलै महिन्यापासून आपल्या सेवा शुल्कात वाढ केल्याने मुंबईकरांचे दुपारचे जेवण महागणार आहे.



डोक्यावर गांधी टोपी, गळ्यात तुळशीमाळ, पांढरा लेंगा आणि सदरा असं वर्णन केलं तर क्षणातच मुंबईचा डब्बेवाला डोळ्यासमोर उभा राहतो. वेळेचं भान ठेवत अचूक ठिकाणी डब्बे पोहोचवणं, हा मुंबईच्या डब्बेवाल्यांचा हातखंडा. मुंबईच्या सामाजिक आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग. सध्याच्या महागाईचा त्यांनाही फटका बसलाय. त्यामुळे त्यांनी सेवाशुल्कात वाढ केली आहे. मुंबईकरांना दुपारचं जेवण मिळतं ते मुंबईच्या डबेवाल्यांमुळे. मराठमोळ्या पोशाखातला हा डबेवाला सर्वांच्या कुतुहलाचा विषय. गेल्या १३५ वर्षांपासून मुंबई डबेवाला ही सेवा सुरू आहे. मात्र आता या डबेवाल्यांना महागाईचे चटके बसू लागलेत. परिणामी, डबे पोहोचवण्याच्या शुल्कात असोसिएशन वाढ केलीय. प्रत्येक डब्यामागे मासिक शुल्क दोनशे रूपयांनी वाढवलंय. काही दिवसांपूर्वी बेस्ट बस आणि रिक्षांची दरवाढ झाली. तसंच वाढती महागाई आणि प्रवासातली वाढती जोखीम या दोन प्रमुख कारणांमुळे दरवाढीचा निर्णय घेतल्याचं असोसिएशननं सांगितलंय. पाच किलोमीटरच्या आत डबा पोहोचवण्यासाठी आता १४०० रुपये शुल्क द्यावं लागणार आहे. त्याहून जास्त अंतरासाठी अतिरिक्त शुल्क आकारलं जाणार आहे.

या दरवाढीमुळे, आता डबा घेण्याच्या ठिकाणापासून ते कार्यालय पाच किलोमीटर अंतरावर असल्यास, जुन्या दरानुसार आकारले जाणारे मासिक शुल्क १२०० होते. आता ते वाढून १४०० रुपये करण्यात आले आहे. तर पाच किलोमीटरच्या पुढे सेवा द्यायची असल्यास, डबेवाल्यांच्या आवश्यकतेनुसार पूर्वीप्रमाणेच प्रत्येकी ३०० ते ४०० रुपये अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे.

दरम्यान मुंबईत काम करणा-या या डबेवाल्यांनी आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनाची परंपरा आजही जपलीय. येत्या ६ जुलै रविवार आणि आषाढी एकादशीची शासकीय सुट्टी आहे, त्यादिवशी डबेवाले पंढरपुरात पांडुरंगाचं दर्शन घेतील. त्यामुळे ७ जुलैला मुंबईत डबेसेवा बंद असेल,८ जुलै मंगळवार डबेवाले नेहमीप्रमाणे कामावर हजर होतील, असे सुभाष तळेकर यांनी म्हटलं.

मुंबईचा डबेवाला, त्यांचं व्यवस्थापन आणि वक्तशीरपणाचं कायम कौतुक होतं. मुंबईच्या संस्कृतीतही मुंबईच्या डबेवाल्यांना महत्त्व आहे. कायम ग्राहकांच्या सेवेचं व्रत घेतलेल्या या डबेवाल्यांना कोरोनापासून काही अडचणींना सामोरं जावं लागलं. आता काहींचं घरातून कामं सुरू आहेत. त्यात स्विगी, झोमॅटोसारख्या खाद्यपदार्थ पुरवणा-या कंपन्यांमुळेही मुंबईच्या डबेवाल्यांसमोरच्या समस्या वाढल्या. पण या संकटकाळात आपल्या कामाचं महत्त्व आणि निष्ठा जाणून ग्राहक आमच्या पाठीशी राहतील. असा विश्वास या मुंबईच्या डबेवाल्यांना आहे.

## थोडक्यात

### खापरखेडा व कोराडी येथील थर्मल ॲश कोणत्याही उद्योजकांसाठी मोफत उपलब्ध - जिल्हाधिकारी इटनकर






**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या खापरखेडा व कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्पातून उपलब्ध होणारी कोळशाची राख ही खसारा, कोराडी, वारेगाव व नांदगाव येथील बंधाऱ्यात पोहचविली जाते. ही राख वीट उद्योगासह विविध ठिकाणच्या विविध भरावासाठी उत्तम पध्दतीने वापरता येते. या राखेला शासकीय पातळीवर कोणतेही मूल्य आकारले जाणार नसून कोणत्याही उद्योजकाला ही राख आता विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या जाईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या छत्रपती सभागृहात आयोजित बैठकीत त्यांनी हा निर्णय घेतला. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्पाचे मुख्य अभियंता विलास मोटघरे, खापरखेडाचे मुख्य अभियंता गिरीश कुमरवार व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोराडी औषणिक वीज केंद्रातुन दररोज बारा हजार मेट्रिक टन तर खापरखेडा येथून दररोज सात हजार मेट्रिक टन राख उपलब्ध होते. या राखेचा उपयोग चांगल्या कारणासाठी व्हावा यादृष्टीने औष्णिक विद्युत प्रकल्प व जिल्हा प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत. कोणत्याही शासकीय व निमशासकीय कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी ही राख उपयोगात यावी यासाठी त्या-त्या कार्यालयांना १२५ रू प्रति टन वाहतुक खर्च दिला जाईल हे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

नागपूर व परिसरातील राख आधारित उद्योग, स्टोन क्रेरी माईन्स, लेआउट भरणा, बांधकाम व्यावसायिक, तसेचं लघुउद्योग (जसे की वीटभट्टी, सिमेंट पाईप, पेवर ब्लॉक उद्योग इत्यादी) यांना संचित राख बंधाऱ्यातून विनामूल्य राख प्रदान केली जाणार आहे.

ही राख महानिर्मिती व पर्यावरण विभागाचे नियम, अधिनियम, शर्ती व अटी यांच्याअंतर्गत उपलब्ध करून दिली जाईल असे बैठकीत सांगण्यात आले. कोराडी व खसारा, वारेगाव राख बंधाऱ्यात मुबलक प्रमाणात राख उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी संबंधितांनी कोराडी व खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या राख उपयोगिता विभागातील संपर्क अधिकारी यांच्या समवेत संपर्क साधावा. कार्यकारी अभियंता प्रवीण मडावी यांना ८४११९५७८७२, तर खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे कार्यकारी अभियंता पंकज धारस्कर यांना ९९२३५८५४८१ या मोबाईलवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

### भाजपा चंद्रपूर जिल्हा ग्रामीण मंडळ अध्यक्षांची नावे जाहीर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** मुंबई येथे झालेल्या विशेष बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या चंद्रपूर जिल्हा ग्रामीण अंतर्गत कार्यरत २७ मंडळांसाठी नवीन मंडळ अध्यक्षांची यादी निश्चित करण्यात आली. ही बैठक भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, रविंद्र अनासपुरे, रणधीर सावरकर, राजेश पांडे, विजयराव चौधरी, माधवी नाईक तसेच विदर्भ संगठन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर हे प्रामुख्याने उपस्थित होते. या नव्या यादीची अधिकृत घोषणा भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांनी आज केली आहे.

**नवीन नियुक्त मंडळ अध्यक्षांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.**

बल्लारपुर शहर- ॲड रणन्जय सिंह, बल्लारपुर ग्रामिण- चंद्रकांत (पिंटु)देऊळकर, मुल शहर- प्रवीण मोहुर्ले, मुल ग्रामिण- चंदु मारगोनवार, दुर्गापुर/उर्जानगर- श्रीनिवास जनगमवार, पोंभुर्णा- हरीष ढवस, गोंडपीपरी - दीपक सातपुते, गडचांदूर शहर - अरुण तुकाराम डोहे, राजुरा शहर - सुरेश हरी रागीट, राजुरा ग्रामीण - वामन मारोती तुराणकर, जिवती- दत्ता हरी राठोड, कोरपना- संजय रामचंद्र मुसळे, नंदोरी - मुधोली- दयानंद जांभुळे, वरोरा शहर- संतोष पवार, नागरी - सालोरी- राजेंद्र सवई, भद्रावती शहर- सुनील नामोजवार, बोर्डा- आबामक्ता- वंदनाताई राजू दाते, घोडपेठ- पाटाळा- श्यामसुंदर उरकुडे, अर्हेरनवरगाव- सुधीर दोनाडकर, तळोधी- हेमराज शांताराम लांजेवार, नागभीड- संतोष विठ्ठल रडके, चिमूर- गजानन गुडधे, भिसी - नेरी- मनीष दत्तात्रय तूम्पलीवार, सावली- किशोर भाऊराव वाकुडकर, ब्रह्मपुरी शहर- सुयोग वामनराव बाळबुधे, ब्रह्मपुरी ग्रामीण- ज्ञानेश्वर राजाराम दिवटे, सिंदेवाही- नागराज मुकुटराव गेडाम यांची नियुक्ती झाली आहे.

जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, पक्षाची विचारधारा आणि धोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ही नवीन टीम प्रभावी कार्य करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे माजी वने व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, चंद्रपूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष हरिश शर्मा, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, आ. किर्तीकुमार भांगडीया, आ. देवराव भोंगळे, आ. करण देवतळे, माजी आ.प्रा. अतुल देशकर, माजी आ. ॲड. संजय धोटे, माजी आ. सुदर्शन निमकर, विजय राऊत, राजेंद्र गांधी, प्रमोद कडु, रमेश राजुरकर, विद्या देवाळकर, प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम, भाजपा जिल्हा महामंत्री संध्या गुरनुले, डॉ. मंगेश गुलवाडे, विवेक बोढे आदींनी अभिनंदन केले आहे.



## संपादकीय

# नसते 'उद्योग' नकोत!

चाळीस वर्षांत अपवाद वगळता एकही मोठा प्रकल्प साकारला न गेल्याने उत्तर महाराष्ट्राचा औद्योगिक विकास खुंटला आहे. राज्य सरकारने आता धातू उद्योग आणि डिफेन्स कॉरिडॉरची टूम काढली आहे. राजकीय मंडळींनी विभागाची अवस्था 'टणटण फुटाणी नि हाती नाही दुगाणी' अशी करून ठेवली आहे.

मंत्रभूमी ते यंत्रभूमी असा प्रवास करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या सुवर्ण त्रिकोणातील शहर असे बिरुद मिरविणाऱ्या नाशिकमध्ये नव्या उद्योग क्षेत्रांना प्रोत्साहन देण्याची घोषणा राज्य सरकारने नुकतीच केली अन् जिल्ह्यासह संपूर्ण विभाग अवाक् झाला. अलीकडच्या काही वर्षांत ठोस काही करण्याऐवजी 'उदंड झाल्या घोषणा' अशी परिस्थिती झालेली असताना, त्यात आणखी एका घोषणेची भर पडल्याने ताज्या प्रस्तावांकडे शंकेने पाहिले जाणे स्वाभाविकच आहे.

दोन-अडीच दशकांत दुर्दैवाने म्हणा किंवा राजकीय नेतृत्व वा इच्छाशक्तीच्या अभावामुळे एकाही मोठ्या उद्योगाची मुहूर्तमेढ या महानगरात होऊ शकलेली नाही. नाशिककर उद्योजकांचा पाठपुरावा करून घसा कोरडा पडण्याची वेळ आली, तरी त्यांचे दुर्दैवाचे दशावतार थांबायला तयार नाहीत. आयटी पार्क, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इलेक्ट्रिकल क्लस्टर, डिफेन्स इनोव्हेशन हब, कृषी उद्योग यांसह वेळोवेळी मिळालेली असंख्य आश्वासने कागदापलीकडे सरकलीच नाहीत. पैकी काही प्रकल्प 'मागील पानावरून पुढे' याप्रमाणे केवळ तोंडी चर्चेच्या पातळीवरच असताना, नाशिक परिसरात धातू उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे राज्य सरकारने जाहीर केल्याने 'आता हे काय नवीन?' अशी प्रतिक्रिया नाशिककरांच्या तोंडून न उमटावी तरच नवल! नाशिकच्या औद्योगिक प्रगतीचे साक्षीदार असलेल्या उद्योजकांनाही म्हणूनच सखेद आश्चर्याचा धक्का बसला.

पूर्वी नाशिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते आणि तसे ते आजही आहेच. काही वर्षांपूर्वी या गावात औद्योगिकीकरणास विरोध होत होता. स्वच्छ हवा आणि हरित पट्ट्याला डंख नको म्हणून उद्योगांना नकार दिला जात होता. (आजही या शहराचे गावपण टिकून राहावे, इथले हवापाणी चांगले राहावे यासाठी काही घटक अशी भूमिका घेत असतात.) त्या काळी तांबे-पितळाची भांडी बनविणे, सिल्क, सोने-चांदीचे धागे तयार करणे, चांदीचे दागिने व भांडी, लाख काम, भांड्यांना कल्हई असे लहान-मोठे उद्योग येथे सुरू होते. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आणि महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येण्यापूर्वीच विडी उद्योगानेही नाशिक परिसरात कास धरलेली होती. अठराव्या शतकाच्या अखेरीस सुरू झालेले यातील काही उद्योग आताआतापर्यंत सुरू होते. चांगले हवामान आणि पाण्याची मुबलक उपलब्धता असूनही १९६२ पर्यंत नाशिक जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला म्हणूनच ओळखला जात होता. १९६४ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) कारखान्याची भेट दिल्यानंतर खऱ्या अर्थाने औद्योगिक विकासाला चालना मिळाली.

तपारिया टूल्स (शहरातील पहिला कारखाना), मायको, एबीबी, महिन्द्रा, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, ग्लॅक्सो, एक्स्लो, गरवारे आदी कंपन्यांनी येथील उद्योगभरारीवर 'चार चाँद' लावले. पुढे मुंबई-पुण्याशी कनेक्टिव्हिटी वाढत गेला तसा नाशिकला या महानगरांखालोखाल औद्योगिक महत्त्व प्राप्त झाले. राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचे औद्योगिकीकरणाचे केंद्र म्हणून विभाग ओळखला जाऊ लागला. सुवर्ण त्रिकोणात परिसर समाविष्ट झाला. दर बारा वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्याच्या माध्यमातून राज्य आणि देशातील प्रमुख शहरांशी रस्ते, रेल्वे आणि हवाई मार्गाने कनेक्टिव्हिटी वाढतच गेली. जगाच्या नकाशावरील नाशिकचे स्थान अधिक ठळक बनत गेले. आज शहरालगत साडेपाच हजार, तर जिल्ह्यात सोळा हजार लहान-मोठे उद्योग अस्तित्वात आहेत. खडतर परिस्थितीतही क्षमता आणि गुणवत्तेच्या जोरावर ते तग धरून असल्याने त्यांचे कौतुकच!

# वर्षा सहलीचा आनंद लुटा पण ...

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत. शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत.

विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदर्याचे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो. अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते. अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता. दोन वर्षापूर्वीतर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड




तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली. पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात. लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही. नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत. खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मर्यादेच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे. धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते. अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे. पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पंढरीत होणार श्री संत मोतीराम महाराज चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०१, पालम (परभणी) :** अनेक वर्षांपासून पंचक्रोशीतील व परिसरातील भाविक भक्तांनी श्री संत मोतीराम महाराज यांचा चरित्र ग्रंथ प्रकाशित व्हावा ही अपेक्षा व्यक्त केली होती. या अनुषंगाने हा सुवर्णयोग जवळ येऊन ठेपला असून या ग्रंथाचे प्रकाशन आषाढी एकादशी दि.६ जुलै रोजी पंढरपूर येथील श्री संत मोतीराम महाराज संस्थान सभामंडप येथे ह.भ.प.अच्युत महाराज दास्तापूरकर यांच्या हस्ते येथे होणार आहे.



संत मोतीराम महाराज यांचा जीवनाविषयी वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, वारकरी यांच्या माध्यमातून विविध माहिती संकलन करून महाराजांचे चरित्र साकारत असून परिसतील भाविक भक्तांसाठी आनंदाची बाब असणार आहे. श्री संत मोतीराम महाराजांचे चरित्र जगासमोर यावं यासाठी ज्यांनी कार्य केले ते सर्व संपादक मंडळ आणि माहिती संकलन करण्यासाठी मोलाचे सहकार्य करणारे मनोहर पौळ फळेकर, किशनराव पौळ गुळखंडकर यांनी सर्वांनी अथक परिश्रम घेऊन श्री संत मोतीराम महाराजांच्या जीवनातील त्या काळातील विविध घटनाच्या नोंदी,प्रसंगाच्या नोंदी घेतल्यामुळेच आज हा चरित्र ग्रंथ पुर्ण स्वरूपात साकारत आहे.

या चरित्र ग्रंथास ह.भ.प.भालेराव गुरुजी लोहेकर, ह.भ.प.आत्माराम महाराज रायवाडीकर, ह.भ.प.केशव महाराज पालमकर, ह.भ.प.विठ्ठलराव पौळ गुरुजी फळेकर व साहित्यभूषण डॉ.घ.ना.पांचाळ यांनी संपादित केले आहे.

या ग्रंथास ह.भ.प.डॉ.किशन महाराज साखरे, ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प.संदीपान महाराज हासेगावकर या मान्यवरांचा अभिप्राय मिळाला असून ही मान्यवर मंडळी या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यासाठी परिसरातील सर्व भाविक भक्त मंडळींनी उपस्थित राहावे अशी आग्रहाची विनंती सर्व बांधकाम समिती सदस्य व व्यवस्थापक मंडळ यांनी केली आहे.

## चौघडा...

अधिवेशन सुरवांत
वाजू लागे चौघडा
रोज तो महोत्सव
बातम्या तडा तडा

विधेयक कुठलेही
जोरां हाणून पाडा
धावत्या गाडीखीळ
घालतो का खोडा

फालतू कारणास्तव
खुर्चीभोवती गराडा
वेळ अन् संपत्तीचा
नको उगाचं चुराडा

प्रश्नांस उत्तरे देता
माहिती खडा खडा
निरुत्तर ते विरोधक
बोलायचे भडाभडा

चुकीचे होता काही
विरोध करा तगडा
जनतेचेकल्याणार्थ
सार्थ ठरावा झगडा

प्रकल्प मंजूर होता
मनाचे चक्छु उघडा
भल्या गोष्टी घडता
नको बा नन्ना पाढा

अश्लाघ्य दिसे जिथं
तिथे हमखास नडा
संविधान आरशाला
नको पडायला तडा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# लेकरांची 'विठूमाऊली'

'श्री विठ्ठल' अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. श्री विठ्ठलाचे भक्त म्हणजेच वारकरी विठ्ठलाला 'माउली' संबोधतात. आई ज्याप्रमाणे बाळाच्या सर्व इच्छा पुरवते, त्याचे लाड करते आणि त्याची काळजीही घेते त्याप्रमाणे विठूमाऊली तिच्या भक्तांच्या समस्त इच्छा पुरवते. भक्तांवर येणारी संकटे परतवून लावते, प्रसंगी भक्ताच्या घरी जाऊन त्याची सेवाही करते. माऊलीच्या अशाच एका भक्ताची कथा संक्षिप्त स्वरूपात आज पाहणार आहोत.

निस्सीम भक्ती आणि पराकोटीच्या भावामुळे साक्षात विठ्ठलालाच बोलावून बंधनमुक्त करण्यास भाग पाडणाऱ्या संत सखुबाई वारकरी संप्रदायाच्या इतिहासात कायमच्या अजरामर झाल्या. कृष्णा नदीच्या काठावर कऱ्हाड या ठिकाणी पती आणि सासू-सासऱ्यांसह राहणाऱ्या सखुबाई भगवंताच्या भक्तीमध्ये सदैव लीन राहायच्या. सखूबाईंचे पती, सासू आणि सासरे या तिघांनाही सखूबाईची भगवत भक्ती रुचत नव्हती त्यामुळे ते तिघेही तिचा पुष्कळ छळ करत; मात्र या छळाला भगवंताची देणगी मानून त्या सर्व काही सहन करत असत. एकदा कृष्णा नदीकाठी सखू पाणी भरण्यासाठी गेल्या असता त्यांना पंढरीकडे निघालेली दिंडी दिसली. विठ्ठल दर्शनाच्या ओढीने त्याही दिंडीत सहभागी झाल्या. याविषयी त्यांच्या घरी कळताच त्यांच्या पतीने त्यांना मारहाण करत घरी आणले आणि घरात एका खुंटीला बांधून ठेवले. पंढरपूर यात्रा संपेपर्यंत त्यांना बांधून ठेवायचे, दोन सप्ताह काहीच खायला प्यायला द्यायचे नाही असे ठरवून तिघेही आपापल्या कामाला लागले. सखुना बांधलेला दोर इतका घट्ट होता कि काही दिवसांनी त्यांच्या शरीराला खड्डे पडू लागले. याही परिस्थितीत त्यांनी आर्त भावाने श्री विठ्ठलाला साद घातली, 'हे नाथा, या डोळ्यांनी तुझे एकदा जरी चरण पाहिले असते, तरी मी तात्काळ प्राण त्यागले असते. मी जशीही आहे तुझीच आहे, तूच मला या बंधनातून मुक्त कर' आर्त भावाने आळवलेली सखूची हाक थेट श्री विठ्ठलाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचली. क्षणाचाही विलंब न करता भगवंताने सुंदर स्त्रीचे रूप घेतले आणि सखूकडे गेला. स्त्री रूपातील भगवंत सखूबाईंना म्हणाला, 'मी पंढरपूरला जात आहे तुला नाही जायचे का ?' यावर सखू उदगारल्या 'मी इथे बांधलेली आहे, माझ्यासारख्या पापिणीच्या नशिबात पंढरपूरची यात्रा कुठे ' यावर स्त्रीरूपातील भगवंत म्हणाला 'बाई मी तुझ्या पाठीशी आहे, तुझ्या जागी मी उभी राहते, माझ्या ऐवजी तू पंढरपूरला जा. असे म्हणून भगवंताने तिच्या शरीराभोवती गुंडाळलेला केवळ दोरखंड मुक्त केला नाही, तर

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

या भवसागरातून सखूबाईंना कायमचे बंधनमुक्त केले. १५ दिवस उपाशी राहिलेल्या सखू मृत पावल्या तर आपण संकटात येऊ या भीतीने तिचे नातेवाईक सखूबाईंचे रूप घेतलेल्या भगवंताचा दोरखंड सोडतात. पुढे सखूबाई येईपर्यंत सखूच्या जागी साक्षात श्री विठ्ठल सखूबाईंच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा करतो. भगवंताच्या सहवासाने सखूच्या पतीच्या आणि सासू सासऱ्याच्या स्वभावात परिवर्तन होऊन त्यांच्या वर्तणुकीत पालट होतो.

भावाचा भुकेला असलेल्या भगवंताने भक्ताच्या घरी जाऊन भक्ताचीच सेवा केल्याची कितीतरी उदाहरणे संत चरित्रांत सापडतात. ज्याप्रमाणे सखूबाईंसाठी त्याने १५ दिवस स्वतःला बांधून घेतले, तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, त्याप्रमाणे त्याने जनाबाईसाठी धुणी धुतली , एकनाथांच्या घरी श्रीखंड्या बनून पाणी भरले आहे. अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत. टाकीचे घाव सोसल्याशिवाय जसे दगडाला देवपण येत नाही तसे प्रतिकूल परिस्थीतिला सामोरे गेल्याशिवाय भक्ताच्या भक्तीची कसोटी लागत नाही. संतांची चरित्रे वाचल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे सर्वच संतांनी जीवनात कितीही घनघोर संकट आले तरी भगवंताची साथ तिळमात्रही सोडली नाही. उलट या परिस्थितीत त्यांनी केवळ भगवंतालाच आळवले. मायेतील प्रलोभने त्यांनी कधी जवळ केली नाहीत. मी भगवंताचा आणि माझा केवळ आणि केवळ भगवंत याच उत्कट भावाने त्यांनी मनोभावे उपासना केली शेवटी भगवंतालाही न राहवून भक्ताच्या साहाय्याला धावून यावेच लागते. भगवंत जसा सखूबाईंना बंधनमुक्त करण्यासाठी आला, संत गोरा कुंभारांना त्यांचे बाळ जिवंत करण्यासाठी आला, संत तुकारामांना सदेह वैकुंठात नेण्यासाठी आला. ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवण्यासाठी आला तसा तो आपल्याही साहाय्यासाठी का धावून येणार नाही ? घरातील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही सखूबाईंनी विठ्ठलाची आराधना सोडली नाही. साधना करताना घरातून होणारा विरोध सहन करत आपणही भगवंताची मनोभावे साधना करतो का ? ज्या आर्ततेने सखूबाईंनी श्री विठ्ठलाला साद घातली त्या उत्कटनेने भगवंताला आपण आळवतो का ? पुंडलिकासाठी जो भगवंत गेली २८ युगे एका विटेवर उभा आहे तो भगवंत आपल्या आर्त हाकेसाठी का बरे धावून येणार नाही ?

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पालकर कुटुंबियांतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०१, लांजा (रत्नागिरी) :** जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कुवे नं.२,ता. लांजा,जि.रत्नागिरी सदर शाळेला सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत या कार्यक्रमाचे औचित्य साधून सोमवार दि.३० जून २०२५ रोजी कुवे गावचे भूमिपुत्र व ज्या शाळेत त्यांची देखील शैक्षणिक जडण-घडण झाली असे चंद्रकांत पालकर व समस्त कुटुंबिय यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना प्रोत्साहन मिळावे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी ही विचार कल्पनेने प्रेरणादायी असा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. उपक्रमाला शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. सामाजिक सौख्य राखणाऱ्या पालकर कुटुंबिय यांचे पंचक्रोशीतुन अभिनंदनासह कौतुक होत आहे.

## श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, बुलडाणा :** श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे आज मंगळवार दि.०१ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त शाळेचे प्राचार्य कावरे सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषवले. त्याचप्रमाणे शाळेची पर्यवेक्षक राजपूत सर, शिक्षकेतर कर्मचारी प्रमुख मांगे बाबूजी, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख भोंडे सर, एच.एस.व्ही.सी.प्रमुख वाघ सर उपस्थित होते. वर्ग ०५ ते १२ चे सर्व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. जय जवान जय किसान या तत्त्वानुसार ज्यांनी काम केले आहे, असे महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री वसंतराव नाईक यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचे काम व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण प्राध्यापक बनसोडे सर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापिका कुमारी अस्मिता इंगळे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सतिश कोमरवेल्लीवार अध्यक्षपदी तर रामदास गिरटकर सचिवपदी बिनविरोध निवड

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, राजुरा (चंद्रपूर) :** नवजिवन शिक्षणप्रसारक मंडळ, विरुर (स्टे.) ता. राजुरा जि. चंद्रपूर रजि. नं. एफ- २४१३(चं) या संस्थेची त्रैवार्षिक निवडणूक सहाय्यक धर्मदाय आयुक्त चंद्रपूर यांचे अर्ज क्र. ६४/२०२५ कलम ४१(अ) दि. ०९/०४/२०२५ रोजी पारित आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. खुशाल खोब्रागडे यांचे अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनात दि. २९ जून २०२५ रोजी इंदिरा गांधी क. महाविद्यालय, विरुर (स्टे) येथे निवडणूक पार पडली.

संस्थेच्या एकूण १० सभासदांपैकी ७ सभासदांनी निवडणूक प्रक्रियेत भाग घेतला. त्यात खालीलप्रमाणे कार्यकारी मंडळ बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. खुशाल खोब्रागडे यांनी केली. अध्यक्षपदी सतिश कोमरवेल्लीवार, सचिवपदी रामदास गिरटकर, उपाध्यक्ष म्हणून खुशाल कोडापे, सहसचिवपदी हरीदास वानखेडे, कोषाध्यक्षपदी गुलाबराव ताकसांडे, कार्यकारिणी सदस्यांमध्ये प्रभाताई कोम रवेल्लीवार आणि खाजाबानो बशिर अहमद यांचा समावेश आहे.

सतिश कोमरवेल्लीवार हे भाजपा राजुरा तालुका उपाध्यक्ष तर रामदास गिरटकर हे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, नागपूर विभाग संघटन मंत्री म्हणून जबाबदारी पार पाडत आहे.

## बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स परिक्षेत आनंद गायकवाड प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.३०, केज :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई येथून मे-जुन २०२५ घेण्यात आलेल्या बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स( ग्रंथालय व माहिती शास्त्र) पदवी परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे ६८.३० टक्के गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

आनंद वसुदेव गायकवाड हे स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता. केज जि. बीड मध्ये कार्यरत आहेत. आनंद वसुदेव गायकवाड यांनी गंथालय व माहिती शास्त्र बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स मध्ये ६८.३० टक्के गुण घेवून उत्तीर्ण झाल्याबद्दल आंबाजोगाई सेंटरचे संचालक डॉ. पी. सी. गादेकर, डॉ. मधुबाला, प्रा.डॉ. आशा गायकवाड, प्रा. डॉ. मुंडे, प्राध्यापक वृंद तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीडचे संस्थापक अध्यक्ष, प्रचार्य, डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड, उपाध्यक्ष - मुरलीधर शिंदे, सचिव - छायाताई सोमवंशी, सहसचिव -ज्ञानोबा भोगजकर, सदस्या सुमनताई गायकवाड, तसेच मित्रपरिवारांकडून आनंद गायकवाड यांचे अभिनंदन होत आहे.

# महाबळेश्वर शहर शिवसेनेतर्फे विविध समस्येबाबत मुख्याधिकारी यांना निवेदन

**रियाज मुजावर**

**महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर शिवसेना शहर च्या वतीने महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रशासकीय मुख्याधिकारी योगेश पाटील यांना म हाबळेश्वर शहराच्या विविध समस्येबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी महाबळेश्वर शिवसेना शहर पदाधिकारी महिला पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी आपण आपल्या नगरपालिकेमार्फत लवकरात लवकर पाठपुरावा करावा व शासनाकडून त्याच्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून घ्यावा यासाठी लागणारी मदत आम्ही सुद्धा आपणास करू विनंती करण्यात आली. सातारा रोड येथील विजेचे खांब उभे केलेले आहेत ते लाईटचे खांब नाल्याम ध्ये उभे केले आहेत. त्या पोलमुळे पावसाचे जाणारे पाणी वाहण्यास वाव मिळत नाही. त्याचप्रमाणे या नाल्यांमध्ये केबल टाकलेली आहे.

त्या केबलवरती मोठ्या प्रमाणात काँक्रीट टाकल्यामुळे नाला बुजला आहे. याच्यावर



सुद्धा आपण जातीने लक्ष घालावे, त्याचप्रमाणे महाबळेश्वर नगरपालिकेच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या हॉटेल बाईक इथे शाळेचे आरक्षण असताना मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर रूम उभारले आहेत ते कुठल्या परवानगीने याची चौकशी होउन बाइक हॉटेलवर लवकरात लवकर कारवाई करावी, त्याचप्रमाणे महाबळेश्वरच्या अनेक समस्या बाबत चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये महाबळेश्वर शिवसेना पदाधिकारी व महिला पदाधिकारी यांनी चर्चेत सहभागी घेतला होता.

महाबळेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून त्या त्या विभागाच्या कर्मचाऱ्यांना कामाच्या संदर्भात सूचना दिल्या व येत्या १५ दिवसांमध्ये महाबळेश्वर शहराच्या सर्व समस्या आपण सोडवू असे शिवसेना पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले. यावेळी महाबळेश्वर शिवसेना शहरप्रमुख विजय नायडू, महाबळेश्वर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक सतीश ओंबळे, शहर संघटक सुनील ढेबे, अल्पसंख्यांक शहर संघटक उस्मान खारखंडे, तालुका शिवसेना वैद्यकीय राजूभाऊ पंडित, सचिन ओंतारी, किरण मोरे, वाई महिला संपर्कप्रमुख वर्षा आरडे, तालुकाप्रमुख महिला मेघा चोरगे, शिवसेना महिला शहर सुनीता फळणे, महिला शाखाप्रमुख मंगल फळणे, महिला शाखा शितल औतारी, महिला विभाग सोनाली बांदल पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

यापुढे सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने महाबळेश्वर शहराच्या विकासाच्या संदर्भात काही अडीअडचणी असतील त्या नागरिकांच्या सम स्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे शिवसेना शहर प्रमुख विजय भाऊ नायडू यांनी ग्वाही दिली.

# शेतकऱ्याची लूट थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन : बाळासाहेब खिलारी

## पारनेर तालुक्यात युरियाची कृत्रिम टंचाई, जादा दराने अन्य खतांचे लिंकिंग करुन विक्री

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** युरीया खताच्या खरेदीसाठी इतर औषधांची सक्ती शेतकर्यांना करून लूट केली जात आहे. याची गंभीर दखल घेऊन संबंधित कृषी दुकानदारांवर तातडीने कारवाई करण्यात यावी. अशी मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे पारनेर तालुका अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी प्रतिष्ठानच्यावतीने तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली. औषधांची सक्ती न थांबल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आला.

सध्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमिवर शेतकर्यांची पेरणीची कामे सुरू आहेत. हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकारने खताची उपलब्धता करून दिलेली आहेत. मात्र युरीया खताची खरेदी करताना पारनेर तालुक्यातील कृषी सेवा केंद्रातून तसेच काही दुकानदार आवश्यक नसलेल्या औषधांची सक्ती शेतकर्यांवर



करीत आहेत.

यामुळे शेतकर्यांची एकप्रकारे लूट होत असल्याची भावना व्यक्त होत असून,औषध घेतले तरच युरीया खत मिळेल, असे सांगण्यात येते. युरीया खत सरकारने उपलब्ध करून न दिल्याचा संभ्रम निर्माण करून दिला जात असल्याच्या अनेक तक्रारी शेतकर्यांनी खासदार निलेश लंके व प्रतिष्ठानच्या पदाधिकार्यांना भेटून निदर्शनास आणून दिल्या आहेत.

निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने आज तालुका कृषी अधिकारी तसेच पंचायत समिति कृषी अधिकारी यांची भेट घेऊन याबाबतचे निवेदन सादर केले. कृषी सेवा केंद्र तसेच काही दुकानांमधून युरीया खत हवे असल्यास जाणिवपूर्वक इतरही औषधं खरेदी करण्याची सक्ती करून एक प्रकारे शेतकर्यांची अडवणूक केली जात आहे.

वास्तविक खताची उपलब्धता असतानाही शेतकर्यांना खत उपलब्ध करून न देणे ही एकप्रकारे शेतकऱ्यांची अडवणूक असून या प्रश्नाची प्रशासनाने गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांवर होणाऱ्या औषधांची सक्ती तातडीने थांबवावी, अशी मागणी प्रतिष्ठानच्या वतीने फोन करून केली आहे. तसेच तालुका कृषी अधिकारी यांना उद्या निवेदन देण्यात येणार असल्याचेही खिलारी यांनी यावेळी सांगितले.

### कृषी दुकानदाराची शेतकऱ्याला अरेरावीची भाषा

काही कृषी सेवा केंद्रावर युरीया उपलब्ध असला तरी तो अवाच्या सव्वा दराने किंवा लिंकिंग खतासोबत विकला जात असल्याचे निदर्शनास आले. २८० रुपयांच्या ४५ किलोच्या युरीया पिशवीसह जबरदस्तीने लिंकिंग खत विकले जाते, ज्यासाठी शेतकऱ्यांकडून तब्बल १००० रुपये वसूल केले जातात, शेतकरी लिंकिंग खत घेण्यास नकार दिल्यास त्यांनी मला अरेरावीची भाषा वापरत अपमानित केले.

**- बबनराव झावरे, टाकळी ढोकेश्वर, स्थानिक शेतकरी**

### कृषी विभागाचे सोयीस्कर दुर्लक्ष...

तालुक्यात राजरोसपणे जादा दराने खत विक्री आणि लिंकिंगची विक्री सुरू असताना देखील तालुक्यातील कृषी विभागाने मात्र गांधारीची भूमिका घेतल्याचे दिसून येते आहे. त्यामुळे या प्रकारचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे सोयीस्कर दुर्लक्ष आहे. याबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# हरी नामाच्या गजरात श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०१, सोलापूर :** आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पालखीचे स्वागत करून माऊलीच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.

धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री श्री. गोरे यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, माजी आमदार राम सातपुते, उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, अमित माळी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माऊलीच्या पालखी स्वागतापूर्वी पालखी सोहळ्यातील नगारा व अश्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

पालखी स्वागतानंतर पालकमंत्री गोरे व प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधींनी हरी नामाचा गजर



करीत पालखी सोहळ्याबरोबर काही अंतर चालत गेले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सोनिया यांनी फुगडी खेळत रामकृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल नामाचा जयघोष केला. तसेच पालकमंत्री महोदय व माजी आमदार राम सातपुते यांनी ही फुगडी खेळली.

### सातारा प्रशासनाच्या वतीने भावपूर्ण निरोप

सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे आगमन सकाळी १०.०० वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी, सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशणी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, फलटणचे उपविभागीय अधिकारी प्रियंका आंबेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माऊलींच्या पालखीला भक्तिमय वातावरणात भावपूर्ण निरोप दिला.

### जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल नामघोषाने आसमंत दुमदुमला...

टाळी वाजवावी, गुढी उभी रहावी,

वाट ती चालावी पंढरीची

या संत वचनानुसार टाळ मृदंगाचा गजर आणि मुखाने जय हरी विठ्ठल... जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा... तुकाराम चा जयघोष करीत वारकरी पालखी सोहळ्यात तल्लीन झाले होते. प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर विठ्ठलाच्या दर्शनाची आस दिसत होती. विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी पंढरीचे अंतर एक एक पाऊल जवळ करीत होता.

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज, वारकऱ्यांसाठी फूट मसाजची व्यवस्था...

पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. पालखी मार्गावर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. हिरकणी कक्षाच्या माध्यमातून महिला वारकरी मंडळी तसेच लहान मुलांसाठी उत्कृष्ट सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच वारकऱ्यांना पायी चालून त्रास होऊ शकतो त्यामुळे त्यांना आराम मिळावा यासाठी फूट मसाज मशीन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वारकरी भाविकांना वारीत कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे.

धर्मपुरी येथे पालखी आगमनापूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने विविध जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आहे. यामध्ये आरोग्य शिक्षण, लेक लाडकी, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्ती, स्वच्छता या विषयांचा प्रामुख्याने समावेश होता.

### दर्शनासाठी भाविकांची गर्दी

सोलापूर जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माऊलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती. नातेपुते येथे पालखीचा मुक्काम धर्मपुरी येथे विसावा घेतल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या मुक्कामासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीची पालखी नातेपुते कडे मार्गस्थ झाली.

# मुंबईतील मशिदीमध्ये वाजणार डिजिटल ‘अजान’


**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०१, मुंबई :** लाऊडस्पीकरच्या वापरावर निर्बंध लादल्यानंतर मुंबईतील सहा मशिदींनी विशेष ऍप असलेल्या मोबाइल फोन ॲप्लिकेशनवर नोंदणी केली आहे. हे मोबाइल ॲप मुस्लिम समुदायातील लोकांना ‘अजान’ होत असताना माहिती देते. ‘ऑनलाइन अजान’ नावाचे हे ॲप तामिळनाडूच्या एका कंपनीने विकसित केले आहे. माहिम जुमा मशिदीचे मुतवल्ली फहद खलील पठाण यांनी या ॲपबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की नमाजसाठी लाऊडस्पीकरच्या वापराशी संबंधित निर्बंध आणि संवेदनशीलता लक्षात घेता, मोबाइल ‘ॲप’ स्थानिक मशिदींमधून थेट नमाज्यांना अजान पोहोचवण्यास मदत करते.

रमजानमध्ये आणि सार्वजनिक निर्बंध असतानाही हे ॲप वापरकर्त्यांना घरी अजान ऐकण्यास मदत करेल. त्यांनी सांगितले की, पोलिसांनी लाऊडस्पीकरच्या वापरावर कडक कारवाई केल्यानंतर हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पोलिसांनी जुमा मशिदीला भेट दिली होती आणि लाऊडस्पीकरच्या वापरावर कारवाई करता येईल असा इशारा दिला होता. यामुळे मशिदीने तात्पुरते लाऊडस्पीकर बंद केले आहेत.

फहाद म्हणाले की, माहिम परिसरातील जुमा मशिदीने अजानची परंपरा सुरू ठेवण्यासाठी हे ॲप स्वीकारले आहे. ते म्हणाले की, हे विशेषतः वृद्ध आणि जवळपास राहणाऱ्या लोकांसाठी (मशिदीत) केले गेले आहे.

तामिळनाडूच्या एका कंपनीने तयार केलेले ॲप




हे ॲप तामिळनाडूच्या तिरुनेलवेली येथील आयटी व्यावसायिकांच्या टीमच्या तांत्रिक मदतीने विकसित केले आहे आणि आता ते ‘अँड्रॉइड’ डिव्हाइसेस आणि आयफोनवर उपलब्ध आहे. हे ॲप मशिदीतून अजान दिल्याच्या वेळी मोबाइल फोनद्वारे अजानच्या थेट प्रक्षेपणाचा ऑडिओ चालवते. पठाण म्हणाले की, लाऊडस्पीकरवरील बंदीमुळे अजान ऐकू न शकणाऱ्या उपासकांना आता या ॲपद्वारे नियोजित वेळेत अजान ऐकता येईल.

या उपक्रमाचे कौतुक करताना उपासकांनी सांगितले की, आता ते लाऊडस्पीकर बंद असतानाही त्यांच्या जवळच्या मशिदीची अजान त्यांच्या मोबाईल फोनद्वारे ऐकू शकतात.आम्ही संघर्ष करण्याऐवजी नावीन्यपूर्णता निवडली. आता मुस्लिम समुदायाचे लोक अजानच्या वेळेशी जोडलेले राहू शकतात. गेल्या तीन दिवसांतच, आमच्या मशिदीभोवती राहणाऱ्या ५०० लोकांनी ॲपवर नोंदणी केली आहे. मुंबईतील एकूण सहा मशिदींनी ॲपमध्ये नोंदणी केली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने लाऊडस्पीकर काढून टाकण्याचे आदेश दिलेले नाहीत, तर आवाजाची मर्यादा निश्चित केली आहे हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४५ डेसिबल. याला प्रतिसाद म्हणून आणि पोलिसांच्या विनंतीनुसार, आम्ही स्वेच्छेने लाऊडस्पीकर वापरणे बंद केले आहे आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यासाठी बॉक्स स्पीकर वापरण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान ‘ऑनलाइन अजान’चे सह-संस्थापकांपैकी एक मोहम्मद अली म्हणाले की, तामिळनाडूतील २५० मशिदींनी या ॲपवर नोंदणी केली आहे. ते म्हणाले की, कंपनी अर्ज फॉर्म, मशिदीचा पत्ता पुरावा आणि अजान देणाऱ्या व्यक्तीचे आधार कार्ड मागते. काँग्रेस मुंबई युनिटचे सरचिटणीस आसिफ फारुकी यांनी मशिदींनी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या या निर्णयाचे स्वागत केले. काँग्रेस नेते म्हणाले की, लाऊडस्पीकर हे मोठ्या प्रमाणात लोकांना जोडण्याचे माध्यम आहे. नमाज महत्त्वाचे आहे, लाऊडस्पीकर नाही. नमाजसाठी आवाहन करण्याचे अनेक मार्ग आहेत आणि मशिदी नवनवीन गोष्टी स्वीकारत आहेत ही चांगली गोष्ट आहे.

भारतीय जनता पक्षाचे (भाजप) नेते किरीट सोमय्या मुंबईतील मशिदींमध्ये लाऊडस्पीकरच्या वापराविरुद्ध मोहीम राबवत आहेत. माजी खासदाराने असा दावा केला आहे की, त्यांच्या मोहिमेमुळे, मुंबईतील अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय वापरल्या जाणाऱ्या १५०० लाऊडस्पीकर काढून टाकण्यात आले आहेत.

# खारघरमध्ये अभिनय प्रशिक्षण शिबीराची उत्साहात सुरूवात

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, पनवेल :** महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबीर खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या उद्घाटनप्रसंगी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, नेत्रा पाटील, युवा अध्यक्ष नितेश पाटील, संध्या सरबिंदे, मुख्य जनसंपर्क अधिकारी पनवेल महानगरपालिका डॉ. राजू पाटोदकर, अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाहक शामनाथ पुंडे, स्मिता गांधी, समीर कदम, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, अमोल खेर तसेच प्रशिक्षक प्रा.रवि धुतडमल, संकेत




खेडकर आणि रंगकर्मी उपस्थित होते.

यावेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले, रोजच्या आयुष्यात आपणा सर्वांना अभिनय करावा लागतो, परंतु उत्तम अभिनय करण्यासाठी आवाजातील चढ उतार, शैली, कौशल्याची गरज असते, त्यासाठी या अशा अभिनय शिबिराची गरज आहे. खारघरकरांसाठी या परिसरात एका नाट्यगृहाची आवश्यकता असून लवकरच ती पूर्ण केली जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. नेहमीच्या रुटीन उपक्रमांपेक्षा मनपाच्या वतीने होत असलेला हा उपक्रम निश्चितच आगळावेगळा असून तो अभिनंदनीय असा आहे.

यावेळी रायगड जिल्हा उपाध्यक्ष ब्रिजेश ठाकूर, यांनीही शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अभिनय प्रशिक्षणासारखा उपक्रम खारघर मध्ये घेतल्याबद्दल त्यांनी मनपाचे व नाट्य परिषदेचे आभार व्यक्त केले.

पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे याकरिता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी पुढाकार घेऊन आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.या कार्यक्रमाचा समारोप अ.भा. नाट्य परिषदेचे कार्यवाहक शाम पुंडे यांनी केला.

महत्त्वाचे म्हणजे मोठ्या प्रतिसादामुळे सकाळी ९ ते १२ दुपारी १ ते ४ आणि सायंकाळी ५ ते ८ अशा तीन सत्रात शिबिर होणार आहे. दोन गटात हे अभिनय शिबीर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे ८ ते १६ व दुसरा गट १६ ते ६० वयापर्यंत आहे. आठ दिवस हे अभिनय शिबीर होणार आहे.

# महिला परिचर यांचे १ जुलैपासून काम बंद आंदोलन





**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०१, सातारा :** प्राथमिक आरोग्य केंद्रात उपकेंद्रात अंशकालीन महिला परिचर यांच्या माधनात वाढ व प्रलंबित प्रश्नावर दिनांक १/७/२०२५ पासून न्याय मिळे पर्यंत राज्यात काम बंद करण्यात येणार आहे असे निवेदन महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महिला परिचर महासंघ सातारा जिल्हा अध्यक्ष सुनिता कोळेकर तालुका अध्यक्ष संगिता भोसले सर्व तालुका अध्यक्ष संघटना पदाधिकारी यांच्या मार्फत पंचायत समिती सातारा येथील आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले.

त्यांच प्रमाणे राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आरोग्य विभाग आयुक्त,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सहसंचालक अव्वर सचिव यांना हि निवेदन देण्यात आले आहे.

राज्यातील अंशकालीन महिला परिचर १९९६ पासून अल्पशा मानधनावर काम करत आहेत आणि चार चार महिने मानधन मिळत नाही.या महिला परिचर अर्ध वेळ असल्या तरी पूर्ण वेळ काम करीत आहेत प्राथमिक आरोग्य केंद्रात दिवस पाळी लावली जाते. शस्त्रक्रिया शिबिर या वेळी सुध्दा काम करत ए एन एम ला सहाय्य करणे,डिलिव्हरी साठी मदत करणे,डिलिव्हरी रुम साफ करणे,बीपी शुगर तपासणी,साफसफाई,लसीकरण सेवा, सत्राला दिवस भर थांबणे,पाच वाजेपर्यंत कामाची सक्ती केली जाते इत्यादी कामे करुन सुध्दा अल्प मानधनावर काम करावे लागत असून महिला परिचराना किमान वेतन देणे व सेवेत घेणे न्यायचित व तर्क संगत आहे.

यांना किमान वेतन मिळावे भाऊबीज व अपघात विमा कवच देण्यात यावे बायोमेट्रिक ची सक्ती करण्यात येऊ नये पाच तारखेच्या आत मानधन मिळावे इत्यादी मागण्यांचे निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आले.

# सुपा येथील डॉक्टरांच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०१, सुपा (अहिल्यानगर) :** सुपा परिसरातील जवळजवळ सर्व दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यासाठी सुप्यातील जवळजवळ सर्वच डॉक्टर गेलेले होते. डॉ. शत्रुघ्न मगर, डॉ. बाळासाहेब पठारे, डॉ. सुभाष डेरे, डॉ. श्रीकांत मेहत्रे, डॉ. सुशील पादिर, डॉ. हनुमंत घायाळ, डॉ. अजय येणारे या सुपा व सुपा परिसरातील डॉक्टरांनी वारकऱ्यांना आरोग्य सेवा दिली. याबद्दल दिंडीतील सर्वच वारकऱ्यांनी डॉक्टरांप्रती





अतिशय चांगली भावना व्यक्त करून डॉक्टरांचे आभार मानले. दिंडीतील वारकरी गेल्या ७ ते ८ दिवसापासून दिंडीमध्ये रोज २० ते २५ किलोमीटर चालत आहेत. त्यामुळे वारकऱ्यांच्या ज्या काही आरोग्याच्या समस्या आहेत. त्या सोडवण्यासाठी सुप्यातील डॉक्टर गेलेले होते व त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे वारकऱ्यांची आरोग्याची काळजी घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे. त्याबद्दल दिंडीतील सर्व भाविक व वारकरी यांनी डॉक्टर मंडळींचे आभार मानले आहेत. सुप्यातील सर्व डॉक्टर गेले ३ वर्षे झाले अशीच आरोग्यसेवा देण्यासाठी पंढरपूरच्या दिशेने दरवर्षी जातात. सुप्यातील डॉक्टरांनी शहांजपूर ची दिंडी, सुप्यातील दिंडी, वाळवणेतील दिंडी व पिंपळनेर येथील संत निळोबाराय देवस्थानच्या दिंडीला आरोग्यसेवा दिलेली आहे.

# थोडक्यात

## पंढरपूरकर गल्लीतील समस्या सोडवण्यासाठी निवेदन

**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि,३०, तुळजापूर (धाराशिव) :** तुळजापूर शहरातील पंढरपूरकर गल्लीत घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असल्यामुळे नुकतेच


जाणता राजा युवा मंच
Rg.No.129/16
सुदर्शन यशवंतराव वाघमारे -अध्यक्ष-
अभिजीत माधवराव कुतवळ -सचिव-
कार्यालय: आर्य चौक,तुळजापूर-४१३६०१,जि.धाराशिव,मो.९८२२८१८१८४, ९४२३०६०९६१
जा.क्र.
दि. 30/06/2025
प्रति,
मा.मुख्याधिकारी साहेब,
नगरपरिषद तुळजापूर. जिल्हा : धाराशिव.
अर्जदार-पंढरपूरकर गल्लीतील समस्त नागरिक
विषय : पंढरपूरकर गल्लीतील विविध समस्या बाबत
महोदय
वरील विषयी विनंती पूर्वक अर्ज करण्यात येतो की, आम्ही प्रभाग, क्र. ४ मधील पंढरपूर गल्ली येथे राहतो. आमच्या परिसरात स्वच्छतेकडे पुरेसे लक्ष दिला जात नाही. अनेक दिवसांपासून कचरा नियमितपणे उचलला जात नाही, गटारे साफ केली जात नाहीत व त्यामुळे परिसरात दुर्गंधी, मच्छर व रोगराईचा त्रास होतो आहे.
सदर समस्या पुढीलप्रमाणे आहेत:
1. कचरा नियमितपणे न उचलल्याने तो रस्त्यावर साचत आहे.
2. गटारे तुंबलेली असून त्यातून घाण सांडत आहे. संपूर्ण नाल्या नादुरुस्त अवस्थेत आहेत
3. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची दुरवस्था आहे.
4. काही ठिकाणी डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांची लक्षणे दिसत आहेत.
5. दुचाकी वाहने(गाड्या) रोडवर व भाजी मार्केट मध्ये लावतात त्या मुळे पंढरपूर गल्ली येथील लोकांना जाण्या येण्या करीता त्रास सहन करावा लागत आहे.
तसेच रुग्णांना घरापासून रुग्णालयात नेण्यासाठी ऑटो रिक्षा येऊ शकत नाही

जाणता राजा युवा मंच तर्फे आज नगर परिषद तुळजापूरला निवेदन देण्यात आले.

यावेळी गटारी तुंबणे, कचरा व्यवस्थापन, मोकाट जनावरे, सार्वजनिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष आणि वाहतुकीतील अडथळे यावर त्वरित उपाययोजनांची मागणी नुकतीच निवेदनावर करण्यात आली आहे. याप्रसंगी निवेदन देताना

सुदर्शन भैय्या वाघमारे, अनमोल साळुंके, नागेश किवडे, ॲड. शुभम खोले, विजय तोडकरी, गोविंद लोंढे, सारंग कावरे, शार्दुल नाईक, केदार शिंदे, देवेंद्र कावरे, ओदुंबर कावरे, महेश शिंदे, सोमा मस्के, महेश पुजारी, जाणता राजा युवा मंच आर्य चौक, तुळजापूर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, ठाणे :** महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त त्यांना अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांनी आज येथे विनम्र अभिवादन केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पाटील यांच्यासह तहसिलदार रेवण लेंभे व जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी कर्मचाऱ्यांनीही पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

स्व. वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्ताने ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## वसंतराव नाईक यांची आज ११२ वी जयंती साजरी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०१, लोकमान्य नगर (ठाणे) :** हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे तिसरे यशस्वी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची आज ११२ वी जयंती साजरी करण्यात आली. हा दिवस राज्यात कृषिदिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने लोकमान्यनगर शाखा क्र.-१०ब येथे विभागप्रमुख संतोष ढमाले, यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे कट्टर समर्थक शाखाप्रमुख आत्माराम जाधव यांनी जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी राजेंद्र कांबळे, शाखाप्रमुख सुनिल जाधव, किरण भुजबळ, उपविभागप्रमुख, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, शिवसेना कार्यकर्ते व बंजारा समाजाचे , वासाराम जाधव, पदम पवार, मुकेश जाधव, ममराज राठोड, अजमल राठोड, राजु चव्हाण, प्रकाश जाधव, दिनेश जाधव, विलास जाधव, टोपा पवार, राजु राठोड, कृष्णा राठोड, गणेश चव्हाण, रमेश साळवेकर ,रमेश राठोड, विठ्ठल राठोड व सर्व बंजारा समाज अन्य उपस्थित होते.



## कृषी विभागाच्या ब्लॉगस्पॉटमुळे मिळणार खतांची माहिती



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०१, ठाणे :** कृषी विभागाने शेतकरी वर्गाला खतांची माहिती मिळण्यासाठी ब्लॉग स्पॉट तयार केला आहे. ठाणे कृषी विभागाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे शेतक-यांना घरबसल्या खताची माहिती मिळणे सोपे झाले आहे. एक क्लिकवर घरबसल्या रासायनिक खतांची माहिती शेतक-यांना उपलब्ध व्हावी, यासाठी ठाणे जिल्हा परिषद अंर्तगत कृषी विभागाने ब्लॉगस्पॉट या माध्यमाचा वापर करून खते माहिती प्रणाली सुरू केली आहे. खते विक्री केंद्राच्या माध्यमातून शेतक-यांना रासायनिक खते वितरित केली जातात. परंतु अनेकदा खतांची उपलब्धतता कळविण्यास विलंब होत असल्याने शेतक-यांचा वेळ वाया जातो.

त्यामुळे खतांची माहिती सहज उपलब्ध होण्यासाठी पर्याय म्हणून कृषी विभागाने https://adothane.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-0-padding_72.html हा ब्लॉगस्पॉट तयार केला आहे. या ब्लॉगस्पॉटमुळे शेतक-यांना त्यांच्या तालुक्यातील कृषी सेवा केंद्रामध्ये खत प्रकार, खत साठा, केंद्र चालकाचा मोबाईल क्रमांक आदी माहिती सहजपणे मिळेल. ही डिजिटल प्रणाली असल्याने जिल्हा, तालुका आणि केंद्रनिहाय माहिती रोजच्या रोज अद्ययावत करण्यात येते. त्यामुळे शेतकरी खत खरेदीसाठी योग्य पद्धतीने निवड करून खत खरेदी करू शकणार आहेत. ब्लॉगस्पॉट हे कोणत्याही स्मार्ट फोनवर मोफत आणि कोणताही अँप डाऊनलोड न करता चालते व वापरणे अतिशय सोपे आहे. याचा फायदा प्रत्येक शेतक-यांला योग्य वेळेत होईल असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.